In Collabroration with Maanavata Hitay Social Foundation & Kamal Foundation
Under Registration Society Act, 12A, 80G, CSR1, Niti Aayog & DSC
मानवता कमल सेवा छत्र
वृद्धाश्रम
समाधानी आयुष्य जगण्याचे एकमेव ठिकाण
Dhanraj Singh Choudhary
7066883322
Under the Guidance of Kawade NGO Consultancy

# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - १ ले. ✻ अंक २६० वा. ✻ मंगळवार दि.२२ एप्रिल २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 1 ✻ Ishue - 260 ✻ Tuesday 22 April 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

# राष्ट्रवादी प्रवेशमुळे आगीतून फोफाट्यात पडल्यासारखी अवस्था होऊ देणार नाही-उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची ग्वाही





कराड : यशवंतराव चव्हाण हे आमच्या पक्षाचे प्रेरणास्थान आहे. विलासकाकांनी यशवंतराव चव्हाण यांचा विचार आयुष्यभर जोपासला. त्यांचे चिरंजीव उदयसिंह उंडाळकर पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश होणे, हा यशवंत विचारांचा प्रीतिसंगम आहे. या पक्ष प्रवेशाने आगीतून उठून फोफाट्यात पडल्यासारखी त्यांची अवस्था होऊ देणार नाही. राष्ट्रवादी पक्षामार्फत उदयसिंह उंडाळकर यांचा योग्य सन्मान केला जाईल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. कराड दक्षिणमधील प्रलंबित विकासकामांना निधीच्या रूपाने बळ देऊ, असेही अजितदादांनी ग्वाही दिली आहे.

शामराव पाटील फळे, फुले मार्केटमध्ये झालेल्या मेळाव्याप्रसंगी ॲड. उदयसिंह पाटील उंडाळकर यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील, आमदार सचिन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, प्रदीप विधाते, ज्येष्ठ नेते दादासाहेब गोडसे, पृथ्वीराज गोडसे, सीमा जाधव, शोभा पोळ, विजयसिंह यादव, राजेश पाटील-वाठारकर, जितेंद्र डुबल, युवा नेते अधिराज पाटील उंडाळकर उपस्थित होते. अजितदादा म्हणाले, शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार जोपासत सर्व धर्म, जात, पंथातील लोकांना घेऊन जाणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. सर्वसामान्यांचा विकास डोळ्यापुढे ठेवून पक्ष काम करत आहे. विलासकाकांबरोबर मी जिल्हा बँक, राज्य सहकारी बँक, विधानसभेत काम केले. त्यांच्या कडक शिस्तीमुळे जिल्हा बँकेला नाबार्डचे अनेक पुरस्कार मिळाले. त्यांच्या विचारानेच जिल्हा बँकेने वाटचाल केल्याने देशातील सर्वाधिक नफा मिळवणारी जिल्हा बँक झाली आहे. त्यांच्या विचारांचा वारसा उदयसिंह पाटील चालवत असून काकांच्या पश्चात तालुक्यातील सहकारी शिखर संस्था त्यांनी चांगल्या चालवल्या आहेत. या संस्थांना लागणारी मदत सरकारकडून केली जाईल. कराड दक्षिण मतदारसंघातील डोंगरी भागातील जलसंधारण, पाझर तलावे, पाटबंधारे, ग्रामीण रुग्णालय व शहरातल्या दत्त चौक येथील कामासाठी शासन स्तरावर त्यांना योग्य ते आर्थिक सहकार्य केले जाईल. वारणेचे पाणी बंदिस्त पाइपलाइद्वारे देण्यासाठीही शासनस्तरावर पाठपुरावा करू.

राजकारणामध्ये यशवंतराव चव्हाण, किसन वीर आबा यांच्या विचारांनुसार राजकारण, समाजकारण करताना जिल्ह्याचे नेते विलासकाका उंडाळकर, लक्ष्मणराव पाटील यांनी एकनिष्ठेने यशवंत विचार जोपासला. काकांच्या पश्चात रयत संघटनेची जबाबदारी उदयसिंह पाटील यांनी चांगल्या प्रकारे सांभाळली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत आल्याचा पश्चात्ताप करण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही. अजित पवार यांनी एकदा शब्द दिला, तर ते कधी मागे घेत नाहीत. आमच्या एकाच घरात मंत्री, खासदारपद त्यांनी दिले यावरून ते स्पष्ट होते. जिल्ह्यात काम करताना विलासकाकांनी जी - जी पदे भोगली ती सर्व पदे उदयसिंह पाटील यांना भोगायला मिळावी, यासाठी आम्ही प्रयत्न करू, असा विश्वास मंत्री मकरंद पाटील यांनी दिला.ॲड. उदयसिंह पाटील उंडाळकर म्हणाले, विलासकाकांनी समाजकारण, राजकारण करताना सर्वसामान्य लोकांना एकत्रित करून रयत संघटनेची निर्मिती केली. संघटनेच्या माध्यमातून विलासकाकांनी सर्वसामान्य लोकांना राजकीय सत्तास्थानी बसवले. संघटनेने अनेक संघर्ष सोसला; पण विचार सोडला नाही. विकासाची भूक भागवण्यासाठी जातीवादी पक्षासोबत न जाता पुरोगामी विचारांबरोबर जाण्याचा निर्णय घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. भविष्यात कराड दक्षिण मतदारसंघ व शहरातल्या काही दळणवळणासह इतर काही प्रश्नांना राज्य सरकारकडून मदत मिळावी, अशी मागणी उदयसिंह पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सोळसकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. धनाजी काटकर यांनी प्रास्ताविक केले. सतीश यादव यांनी सूत्रसंचालन केले. वसंतराव जगदाळे यांनी आभार मानले.









### २०१४ कराड दक्षिणचे वेगळे चित्र असते

पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री होते. पुढे कराड दक्षिणचे ते आमदार झाले. काँग्रेसने २०१४ मध्ये पृथ्वीराज चव्हाण यांना तिकीट दिले. त्या वेळी मी विलासकाकांना आमच्या राष्ट्रवादी काँगेसमधून उभे राहण्याची विनंती केली होती. त्या वेळी काकांनी अपक्ष राहणे पसंत केले. त्या वेळी विलासकाका राष्ट्रवादी काँग्रेसमधून उभे राहिले असते, तर २०१४ चा निकाल महाराष्ट्राला वेगळा पाहायला मिळाला असता, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी नमूद केले.

### निवडणुकाच होईनात काय करायचे

ग्रामीण भागाचे सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केल्या. त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागल्या पाहिजेत हा आमचा प्रयत्न आहे. मात्र, २०२२ मध्ये मुदत संपली. आता २०२५ आले, तरीही निवडणुका झालेल्या नाहीत. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका होत नाहीत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी काय करायचे ? असा सवाल उपमुख्यमंत्री पवार यांनी उपस्थित केला.

### देशात सातारा जिल्हा बँक अग्रणी

स्टेट बँक, जिल्हा बँक, कॅबिनेट, आमदार असांता मी काकांडू काम केले, काकानी रयत संघटनेच्या माध्यमातून आयुष्यभर यशवंत विचार जपला. त्यांचे वारसदार उदयदादा असून कराडच्या भूमीत दोन यशवंत विचारांचा संगम होत आहे. विलासकाकांनी दीर्घकाळ सातारा जिल्ह्यावर एकहाती वर्चस्व ठेवले. त्यांच्या कडक शिस्तीमुळेच जिल्हा मध्यवर्ती बँक अव्वल आहे. देशातील जिल्हा बँकांमध्ये सर्वात जास्त नफा मिळवणारी, काकांनी शिस्त लावलेली जिल्हा मध्यवर्ती बँक देशात पहिली आहे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी सहकाराची मुहूर्तमेढ रोवली. काकांनी हा सहकार वाढवला, काकांनी डोंगरी, दुर्गम, बहुजन, वंचित समाजाला विकासाच्या प्रवाहात आणले. प्रत्येक तालुक्यात कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले. प्रत्येक तालुक्यात त्यांना मानणारा वर्ग आहे. काकांनी निर्माण केलेल्या या कार्यात भर धावण्याचे काम उदयदादा करत आहेत.

### विलासराव देशमुख पराभूत झाले कराडला आले

काँग्रेस नेते विलासराव देशमुख यांचा १९९५ सालच्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला होता. विलासराव, अनंतराव थोपटे व काका हे त्रिकुट होते. विलासरावांचा बँड पेंच सुरू होता, त्यावेळी तेही कराडला काकांकडे बाजार समितीत मुक्कामी होते, अशी आठवण अजितदादांनी सांगितली.

### रयतची आर्थिक उलाढाल वाढवा

रयत संघटनेच्या ताब्यात असलेल्या सर्व सहकारी संस्थांचा टर्न जओव्हर १७०० कोटी रूपये असल्याचे उदयदादांनी मला सांगितले आहे. २००० कोटीपर्यंत नेण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. ते पूर्ण केले तर २५०० कोटी टर्न ओव्हरचे टार्गेट ठेवा. त्यात काही अडचणी आल्या तर मी आणि मकरंद पाटील तुम्हाला पूर्ण सहकार्य करू, असे अजितदादांनी आपल्या भाषणात सांगितले.

### मुख्यमंत्र्यांनाही विलासकाका जाब विचारत

महाराष्ट्रात दबदबा असणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये विलासकाकांचा समावेश होता. बेट मुख्यमंत्र्यांनाच जाब विचारण्याचे धाडस त्यांच्यात होते. त्यांचे नेतृत्व स्वच्छ आणि प्रामाणिक होते. त्यांच्यावर कधीही भ्रष्टाचाराचे शिंतोडे उडाले नाहीत. विधानसभेतही काकांना मान होता. मंत्रिमंडळात त्यांच्या शब्दाला वजन होते.

### मोबाईल म्हणजे हाणमा मोरे

सर्वसामान्यांच्या प्रश्नांची विलासकाका सामान्यांच्या सतत संपर्कात असायचे, ते कधीही मोबाईल वापरायचे नाहीत. त्यांचा मोबाईल म्हणजे हाणमा मोरे हा ड्रायव्हर होता. नेत्यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करावा लागायचा. त्यामुळे त्या काळात मुख्यमंत्र्यापासून मंत्री व सर्वाच्या मोबाईलमध्ये हाणमा विलासकाका' असा नंबर सेव्ह असायचा, असे अजितदादा यावेळी म्हणाले.

### मकरंदआबांची साद उदयदादांचा प्रतिसाद

राजकारणात विलासकाकांना लक्ष्मणतात्या पाटील यांची भक्कम साथ मिळाली. ही राम-लक्ष्मणाची जोडी होती. हा मैत्रीचा धागा त्यांच्या पुढील पिढीनेही जपला आहे. यापुढेही तो जपावा आणि जिल्ह्याचा विकास साधावा. मकरंदआबांनी साद दिली. उदयदादांनी त्याला प्रतिसाद दिला. राष्ट्रवादीत त्यांना मानसन्मान देण्यात येईल. चांगल्या पद्धतीने सन्मान होईल, असा शब्द दादांनी दिला.

### विलासकाकांचे जिल्ह्या राजकारण वर्चस्व

काका सामान्यांसाठी सतत रिचेबल होते. दक्षिणमध्ये काय सुरु आहे. जिल्ह्यात काय सुरू आहे, विरोधकांच्या गोटात काय सुरू आहे, याची माहिती त्यांना असायची. त्यांच्या अनेक विरोधकांनी पुढे आयुष्यभर काकांचे कार्यकर्ते म्हणून काम केले. पृथ्वीराजबाबा निवडून आले असतानाही काकाच जिल्ह्याचे राजकारण पाहात होते. सामान्यांशी त्यांची नाळ होती. सामान्यांना त्यांना मध्यस्ताशिवाय भेटता येत होते. अनेकवेळा ते बाजार समितीत साध्या खोलीत मुक्काम करायचे, इतका साचा नेता पुन्हा या भागात होणार नाही, असे अजितदादा म्हणाले.

# माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या संवेदनशीलतेमुळे पालकांची सोय





कराड : येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दिनांक १९ एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान सीईटीच्या परीक्षेकरिता विविध जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांची बैठक व्यवस्था राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री बाळासाहेब पाटील यांच्या सूचनेनुसार यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड या ठिकाणी करण्यात आली आहे.

दिवसेंदिवस वाढत असलेल्या तीव्र उन्हाच्या कडाक्यामुळे असह्य उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर अनेक पालक परिक्षा केंद्राबाहेर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सापडेल त्या ठिकाणी सावलीचा आधार घेऊन उभे राहिलेले निदर्शनास आल्यानंतर बाळासाहेब पाटील यांनी यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड येथील व्यवस्थापनास सूचना देऊन या सर्व विद्यार्थी पालकांची बैठक व्यवस्था, थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार या सर्व विद्यार्थी व पालकांची बैठक व्यवस्था यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स येथील व्यवस्थापनाकडून या ठिकाणी करण्यात आली आहे. याबाबत विविध जिल्ह्यातून आलेल्या पालकांनी व परिक्षार्थीनी समाधान व्यक्त केले.

**माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या निदर्शनास ही बाब निदर्शनास आल्याने त्यांनी तात्काळ शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनास सूचना करून विद्यार्थ्यांना परीक्षासाठी सोडावयास आलेल्या त्यांच्या पालकांची सोय केली आहे. बाळासाहेब पाटील यांची संवेदनशीलता यामुळे दिसून आले आहे.**

# कराडचा खेळाडू सुशांत वाघमारेंची निवड



कराड : यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराडचा खेळाडू सुशांत शांतीनाथ वाघमारे बी. एस्सी. भाग -३ याची आखिल भारतीय विदयापीठ सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर सॉफ्टबॉल ( पुरुष ) संघात निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी अल्ताफहुसेन मुल्लासाहेब, संस्थेचे विश्वस्त व सदस्य अरुण पाटील (काका ), प्राचार्य डॉ. एस.बी.केंगार, उपप्राचार्य एस. एल.महामुनी, रजिष्टर जे. एम. पवार, शारीरिक शिक्षण संचालक प्रा अमरसिंह सावंत, प्रा. दिग्विजय पाटील यांनी मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय....

# केरळचे विशेष आकर्षण!

समुद्रसपाटीपासून सव्वापाच हजार फूट उंचीवर वसलेले मुन्नार हे केरळमधील थंड हवेचे ठिकाण. तसे कोची ते मुन्नार अंतर १४० किलोमीटर आहे, पण बराचसा रस्ता पश्चिम घाटातील डोंगरालगतचा आहे; चढाचा आणि म्हणून वळणावळणाचा आहे. त्यामुळे रस्ता खूप चांगला असूनही तेवढे अंतर कापायला आम्हाला पुरे पाच तास लागले. दुतर्फा डोंगरउतारावर चहाचे मळेच मळे दिसतात. वाऱ्यावर चहाची पाने हलतात तेव्हा हिरव्या समुद्रावर लाटांचा खेळ चालला आहे असा भास होतो. कितीही वेळ रोखून पाहिले तरी नजर हटवावीशी वाटत नाही. मळ्यांमधे जागोजागी सिल्व्हर ओकची उंच झाडे ओळीने लावलेली असतात आणि त्यांना कवेत घेऊन ढग पुढे सरकत असतात. डोंगरांतून मधूनच बाहेर पडून खाली कोसळणारे फेसाळते धबधबे तर पावलोपावली आहेत. एक सगळा दिवस एखादा चहाचा मळा बघण्यात जातो. केरळला येणारे सर्वाधिक प्रवासी मुन्नारला भेट देतात यात नवल नाही.

मुन्नारनंतरचा थांबा होता टेकाडी. इथले मुख्य आकर्षण म्हणजे 'स्पाइस फार्म'. इथे मसाल्यांचे प्रत्यक्ष उत्पादन हा दुय्यम मुद्दा आहे; मसाल्याची झाडे असतात तरी कशी, हे पर्यटकांचे कुतूहल शमवणे हा मुख्य उद्देश. तेथीलच एका फार्मवर आम्ही गेलो. तिथे एक महिला वेगवेगळ्या मसाल्यांचे उपयोग सांगत होती, तो विशिष्ट मसाला हे कुठल्या रोगांवर उत्तम औषध आहे हेही सांगत होती. बहुसंख्य पर्यटक हे आरोग्यासाठी बऱ्यापैकी खर्च करू शकतात याची तिला जाणीव होती. तेथील विक्रीकेंद्रात जवळजवळ सर्वांनीच काही ना काही महागडी खरेदी केली. मसाल्यांची विक्री हाही स्पाइस फार्म चालवण्यामागचा एक महत्त्वाचा उद्देश असावा!

टेकाडी येथील आमच्या हॉटेलजवळच असलेल्या एका मैदानातील सभागृहात कथकली या केरळमधील पारंपरिक नृत्यप्रकाराचे एक प्रात्यक्षिक बघायचा योग आला. त्यात लक्ष्मण आणि शूर्पणखेची कथा सादर केली गेली. इथे सर्व कलाकार पुरुषच असतात आणि वेगवेगळे रंगीबेरंगी मुखवटे घालून ते वावरत असतात. मागे मी केरळप्रवासात कथकलीचा जो प्रयोग बघितला होता त्याच्यापेक्षा हा खूप आटोपशीर होता; फक्त तासाभरात संपला. पूर्वीचा प्रयोग दोन-तीन तास लांबलेला होता. त्यात वेगवेगळे कलाकार आपले कपडे कसे परिधान करतात, मेक-अप कसा करतात हेही खूप वेळ दाखवले होते व त्यामुळे तो प्रयोग खूप कंटाळवाणा वाटला होता. यावेळी प्रयोगात प्रेक्षकांना मंचावर काहीतरी करून दाखवण्यासाठी बोलावले जात होते व त्यामुळे प्रयोगाला एक जिवंतपणा लाभला होता. कलाकारही तरुण होते. पारंपरिक कलाप्रकारांनादेखील असे समयोचित रूप देणे आवश्यक आहे. या प्रयोगासाठी दीडशे रुपये तिकीट होते आणि शिवाय प्रेक्षक टीपही देत होते. भारतातील सहा प्रमुख शास्त्रीय नृत्यांमधली मोहिनीअट्टम आणि कथकली ही दोन नृत्ये केरळमधील आहेत.

याच मैदानात 'कलारी संघम' आहे. तिथे कलारीची प्रात्यक्षिके बघायचा योग आला. लाठ्या, भाले आणि तलवारी या पारंपरिक हत्यारांचा वापर करून दोन योद्धे एकमेकांना भिडत होते. तशी ती लुटुपुटीचीच लढाई असायची, पण सकृतदर्शनी तरी पूर्ण त्वेषाने लढली जात होती. कलारी म्हणजे केरळची एक पारंपरिक मार्शल आर्ट आणि ती शिकवणारी एक प्रकारची व्यायामशाळा. इथे प्रत्येकाला एक गुरू असणे आवश्यक आहे आणि एकूणच गुरू-शिष्य परंपरा इथे जपली जाते. ज्युडो, कराटे आणि तायक्वान्डो या आजच्या जगभर पसरलेल्या मार्शल आर्ट्र्सचे मूळ याच कलारीमध्ये आहे. साधारण अकराव्या शतकात ही परंपरा केरळमधे निर्माण झाली. त्याकाळी आधुनिक शस्त्रे फारशी प्रचलित नव्हती; शारीरिक बळाला आणि चपळाईलाच महत्त्व होते. पुढील काळात मात्र ही पारंपरिक मार्शल आर्ट बऱ्यापैकी विस्मृतीतच गेली. पर्यटनामुळे या युद्धकलेला पुन्हा उजळा मिळाला. ही प्रात्यक्षिके प्रेक्षकांना खूप भावत होती असे त्यांच्या प्रतिसादावरून जाणवत होते. विशेषतः दोन-तीन पेटत्या रिंग्जमधून आडवी उडी मारत पलीकडे जाणे.

सर्कशीचे आधुनिक संदर्भातील महत्त्व व्लादिमिर लेनिनने जाणले होते. रशियन क्रांतीनंतर त्याने या लोककलेला बॅले किंवा ऑपेरा या उच्चभ्रू कलांच्या तोडीचे स्थान दिले; रशियाचा एक मानबिंदू बनवले. केवळ राजकीय विचारसरणीमुळे नाही तर सांस्कृतिकदृष्ट्यादेखील आम्ही तुमच्यापेक्षा वरचढ आहोत, हेच जणू त्यातून त्याला पाश्चात्य जगाला दाखवून द्यायचे होते. अलीकडे सर्कशीचे आकर्षण कमी-कमी होत गेले आहे. पण करमणुकीचा एक आद्य प्रकार हे सर्कशीचे ऐतिहासिक स्थान मात्र कायम राहील. 'गीव्ह पीपल इनफ ब्रेड अँड सर्कस अँड दे विल बी हॅप्पी...' असे रोमन साम्राज्याच्या संदर्भात म्हणत ते खरेच असावे.आपले एक विशेष आकर्षण (यूएसपी) म्हणून केरळ पर्यटनखात्याने आयुर्वेदाचीही निवड केली होती. भारत जगाला काय देऊ शकेल याची जेव्हा चर्चा होते तेव्हा आयुर्वेदाचा उल्लेख आवर्जून होतो. अनेक लहानमोठे आयुर्वेदिक रिसॉर्ट्स केरळमध्ये जागोजागी आहेत. खास 'आयुर्वेदिक हेल्थ पॅकेज टुर्स' असतात. 'केरला आयुर्वेदिक मसाज' हे या टुर्सचे मोठेच आकर्षण आहे. कुठल्याही पंचतारांकित हॉटेलला साजेसे असेच इथले दर असतात. पहिल्यापासूनच हाय-एंड टुरिझम म्हणतात त्यावर केरळने लक्ष केंद्रित केले आहे. बॅक वॉटर हे केरळ प्रवासातील एक मोठे आकर्षण. बॅक वॉटर म्हणजेच जमिनीत घुसलेले समुद्राचे पाणी. त्यातून तुम्ही बोटीने प्रवास करू शकता. पाण्याच्या दोन्ही बाजूंना नारळाची झाडे आहेत, भाताची खाचरे आहेत, एकमेकांना चिकटून चिकटून बांधलेली घरे आहेत. काही घरांमधून बोटीतल्या प्रवाशांना चहापाणी-जेवण पुरवायचीही सोय आहे. ओणम या केरळच्या मुख्य सणाच्या वेळी येथे होणाऱ्या बोटींच्या शर्यती प्रसिद्ध आहेत. त्या बघण्यासाठी लांबूनलांबून प्रवासी येतात. जलमार्गांचे असे जाळेच केरळमध्ये आहे; इटलीमधल्या व्हेनिस शहराची आठवण करून देणारे. (अर्थात कुठलीही तुलना खूप ताणू नये!)पर्यटनाला उत्तेजन देण्यासाठी केरळ सरकारने केरला टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (केटीडीसी) ही आस्थापना सुरू केली. केटीडीसीची काही वैशिष्ट्ये आवर्जून नमूद करावीत अशी आहेत. पहिले म्हणजे आपल्याकडे ताजमहालसारखी भव्य बांधकामे नाहीत, महाबलीपुरमसारखी प्राचीन शिल्पे नाहीत, चितोडसारखे ऐतिहासिक किल्ले नाहीत; पण निसर्गाने दिलेले आगळेपण भरपूर आहे हे त्यांनी हेरले. उदाहरणार्थ, भारतात अन्यत्र कुठे फारसे न आढळणारे बॅकवॉटर्स, स्पाइस फार्मस, आयुर्वेद केंद्रे आणि तब्बल सहाशे किलोमीटर लांबीची किनारपट्टी.

# वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ

मनोरंजन व्यवसायात योगदान देणाऱ्या विविध घटकांना एका मंचावर आणून त्यांना परस्पर सहकार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या वेव्हज शिखर परिषदेविषयी

भारत हा मनोरंजन आणि माध्यम उद्योग जगतातला एक आघाडीचा आणि तितकाच महत्त्वाचा देश. भारतात या उद्योग क्षेत्राची प्रगतीही तितक्याच झपाट्याने होत आहे आणि त्यासोबतच या परिसंस्थेच्या अवकाशात सातत्याने होत असलेल्या बदलांसह हे क्षेत्रही तितक्याच सातत्यपूर्णतेने बहरत चालले आहे. आज या क्षेत्राकडे नीट पाहिले तर विविध व्यासपीठांवरच्या आशय निर्मितीनेही मोठी उसळी घेतल्याचे दिसते. यामागचे कारण म्हणजे देशातील वाढत्या डिजिटल प्रसारण सेवा, प्रादेशिक भाषांमधील आशय सामग्री निर्मिती आणि सातत्याने नव्या, खिळवून ठेवणाऱ्या, सर्वसमावेशकतेची जाणीव करून देणाऱ्या आशयाची वाढती मागणी करत असलेला देशातला तंत्रज्ञानस्नेही प्रेक्षक वर्ग. त्यामुळेच तर आता भारतासाठी हे क्षेत्र केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून मर्यादित राहिलेले नसून, हे भारतासाठी सांस्कृतिक अभिव्यक्ती, आर्थिक विकास आणि जागतिक पटलावर आपला प्रभाव पाडण्याचे एक सामर्थ्यशाली माध्यम झाले आहे.

लवकरच मुंबईत जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद होणार आहे. येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान महाराष्ट्रात, मुंबई इथे ही शिखर परिषद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेच या परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतिबिंब असलेला एक मंच ठरणार आहे आणि वेव्हज बाजार हा या शिखर परिषदेअंतर्गतचाच एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.


खरे तर गेल्या अनेक दशकांपासून मी या क्षेत्रातच जगतो, वावरतो आहे. या इतक्या प्रदीर्घ काळातील माझ्या स्वत:च्या अनुभवांवरून मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकतो ती म्हणजे कथात्मक मांडणीत लोकांना एकत्र आणण्याची, त्यांना प्रेरित करण्याची आणि एकुणात परिवर्तन घडवून आणण्याची मोठी ताकद असते. याच पार्श्वभूमीवर वेव्हज आणि वेव्हज बाजाराच्या माध्यमातून भारताने जागतिक मनोरंजन क्षेत्रासाठी एका व्यापक सहकार्यपूर्ण भागीदारीचे आणि सर्वसमावेशक भविष्य घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

खरे तर वेव्हज बाजार ही ऑनलाइन बाजारपेठेसाठी आखली गेलेली एक क्रांतिकारक संकल्पना आहे. ही ऑनलाइन बाजारपेठ म्हणजे जागतिक मनोरंजन परिसंस्थेअंतर्गतचे व्यावसायिक तज्ज्ञ, उद्योग - व्यवसाय, आणि कलाकारांना परस्परांसोबत जोडून देणारे माध्यम ठरणार आहे. या बाजारपेठेअंतर्गत या क्षेत्रातील परस्पर सहकार्य सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे.

याद्वारे या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांना नव्या संधी शोधण्याची आणि सहकार्यपूर्ण भागीदारी स्थापित करण्याची संधी मिळणार आहे. या बाजारपेठेला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक अभिनव व्यवसाय केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचाच सरकारचा प्रयत्न आहे. भारताचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी २७ जानेवारी २०२५ रोजी या अभिनव बाजारपेठेचे औपचारिक उद्घाटन केले होते. आर्थिक क्षेत्रात दावोस शिखर परिषदेचे स्थान आहे, तेच मनोरंजन क्षेत्रात वेव्हज शिखर परिषदेला मिळवून देण्याचा दृष्टिकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला होता. त्या दृष्टीने वेव्हज बाजार महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

वेव्हज बाजाराच्या अधिकृत संकेतस्थळावर आतापर्यंत, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विविध क्षेत्रांमधील सुमारे ५५०० खरेदीदार, २००० पेक्षा जास्त विक्रेते आणि जवळपास १००० प्रकल्पांसाठी नोंदणी केली गेली आहे. भविष्यात या संकेतस्थळाला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठीच्या आशय सामग्रीची एक सर्वसमावेशक बाजारपेठ आणि परस्पर संपर्काच्या केंद्राचे स्वरूप प्राप्त करून देणे हा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीनेच संकेतस्थळाला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रोफाइलिंग म्हणजेच त्या त्या व्यक्तींची व्यावसायिक ओळख करून देण्याची तसेच मागणीनुसार जुळवणी करून देण्याच्या तंत्रज्ञानाचीही जोड दिली गेली आहे.

या माध्यमातून ऑनलाइन संकल्पना मांडण्याचे सत्र, ऑनलाइन बीटूबी बैठका (विविध व्यावसायिक प्रतिनिधींच्या बैठका), वेबिनार या आणि अशाच प्रकारच्या इतर




महत्त्वाच्या सत्रांचेही आयोजन केले जाणार आहे. ही बाजारपेठ म्हणजे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या अवकाशातील चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, वर्धित वास्तव (एक्स्टेंडेड रिॲलिटी), संगीत, ध्वनी संयोजन, नभोवाणी या आणि अशा विविध क्षेत्रांमधील भागधारकांना एकत्र आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हे व्यासपीठ विक्रेते आणि खरेदीदारांतील दुवा ठरेल आणि त्याद्वारे व्यावसायिकांना आपली कौशल्ये सुलभतेने सादर करण्याची, त्यांच्या संभाव्य ग्राहकांसोबत थेट संपर्क साधण्याची आणि उपयुक्त सहकार्यपूर्ण भागीदारीची संधी उपलब्ध करून देत राहील.

एखादा चित्रपट दिग्दर्शक आपल्या चित्रपटासाठी निर्मिती भागीदाराच्या शोधात असेल, एखादा जाहिरातदार योग्य व्यासपीठाच्या शोधात असेल, एखादा गेम डेव्हलपर गुंतवणूकदाराच्या शोधात असेल किंवा एखादा कलाकार आपल्या कलाकृतींना जागतिक स्तरावरील प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित असेल, तर अशा सर्वांसाठी वेव्हज बाजारपेठेचा हा मंच म्हणजे परस्पर संपर्क, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचे बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी मोठी जागा किंवा बाजारपेठ असणार आहे.

एका अर्थाने वेव्हज बाजार ही एकप्रकारची समन्वित बीटूबी बैठकांची अभिनव बाजारपेठ आहे, जिने जागतिक मनोरंज क्षेत्रातील परस्पर संपर्क व्यवस्था, परस्पर सहकार्यपूर्ण भागीदारी व्यवस्था, आणि विकासाचा संपूर्ण चेहरामोहरा अगदी क्रांतिकारकरीत्या बदलला आहे. या बाजारपेठेने चित्रपट, दूरचित्रवाणी, संगीत, गेमिंग, ॲनिमेशन, जाहिरात तसेच वर्धित वास्तव (एक्स), आभासी वास्तव (व्हीआर) यांसारख्या जिवंत अनुभूती देणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित तज्ज्ञ व्यावसायिकांना एकत्र आणणारा मंच उपलब्ध करून दिला आहे. आणि याद्वारे विविध सर्जनशील क्षेत्रांसाठीच्या आशय सामग्रीचे सूचीकरण, त्याचा शोध आणि संबंधित व्यवहारांसाठीचाही एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. चित्रपट वितरणासाठीचा मंचाच्या शोधात असलेले निर्माते, नव्या संकल्पना मांडू पाहणारे गेम डेव्हलपर किंवा लायसन्सिंग संधींच्या शोधात असलेले साऊंड डिझायनर अशा सगळ्यांसाठी वर्गवारीनुसार सूचीकरण, सुरक्षितपणे सादरीकरणे पाहण्याची दालने आणि संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देत ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ करणारी बाजारपेठ म्हणून वेव्हज बाजार उदयाला येणार आहे.

या बाजारपेठेच्या माध्यमातून भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे जात विक्रेते आणि खरेदीदारांना त्यांच्यासाठीचा योग्य भागीदार आणि संधी शोधण्याच्या दृष्टीने सक्षम करणाऱ्या सुविधांचा अंतर्भाव केला आहे. चित्रपट स्टुडिओ, ॲनिमेशन हाऊस, पॉडकास्ट निर्माते, मार्केटिंग यंत्रणा यांसारख्या विक्रेत्यांना आपल्या सेवा आणि त्यांच्याकडची आशय सामग्री जागतिक गुंतवणूकदार, वितरक आणि भागीदारांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दुसरीकडे खरेदीदारांसाठीदेखील उच्च गुणवत्तेचे, आधुनिक काळाशी सुसंगत प्रकल्प या बाजारपेठेमुळे उपलब्ध होऊ लागले आहेत.

त्याच वेळी गुंतवणूकदारांसाठी देखील सहनिर्मितीच्या करारांची आणि व्यापक व्यावसायिक संधींची दारे खुली झाली आहेत. इथे आवर्जून उल्लेख करायला हवी अशी गोष्ट म्हणजे या व्यासपीठाला या उद्योग क्षेत्राशी संबंधित विशिष्ट उपक्रम, सादरीकरणे पाहण्याची दालने, गुंतवणूकदारांबरोबरच्या बैठका - चर्चा आणि कलाकृतींच्या थेट प्रक्षेपण सत्रांसारख्या लाइव्ह स्क्रीनिंगसारख्या उपक्रमांशी जोडले गेले आहे, यामुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून केवळ आभासी संवादाच्या पलीकडे जात खऱ्या अर्थाने उपयुक्त असलेले करार आणि व्यवहार प्रत्यक्षात साकारले जातील याचीच सुनिश्चिती झाली आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलात वेव्हज शिखर परिषद होणार असून त्यावेळी हा वेव्हज बाजारही साकारला जाणार आहे. यानिमित्ताने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल बाजारपेठेवर नोंदणी केलेल्या काही निवडक प्रतिनिधींना या बाजारपेठेत आपल्या संकल्पना मांडण्याची, या उद्योग क्षेत्रातील विविध घटकांसोबत संपर्क प्रस्थापित करण्याची, आघाडीच्या भागधारकांसोबत प्रत्यक्ष करार आणि व्यवहार पूर्णत्वाला नेण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अभिनव दृष्टिकोनामुळे वेव्हज बाजार केवळ एक व्यासपीठ म्हणून मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट, परस्परांशी अधिक जोडलेले आणि जागतिक पातळीवरील सर्वसमावेशक मनोरंजन क्षेत्राच्या दिशेने सुरू झालेली चळवळच ठरले आहे.

एक कलाकार म्हणून, आम्ही कायमच आव्हानात्मक, प्रेरणादायी आणि चौकटीपलीकडे जाऊन विचार करायला लावणाऱ्या अवकाशाच्या शोधात असतो. वेव्हज हा अशाच प्रकारच्या अवकाशाच्या निर्मितीचा प्रयत्न आहे. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या वाटचालीचा आपणही एक भाग असल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो. ही परिषद आपल्या परस्परांशी संपर्काच्या, कलाकृतींच्या निर्मितीच्या आणि मांडणीच्या पद्धतींमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणेल. हा बदल केवळ भारतापुरता मर्यादित नसेल तर त्याचा प्रभाव अवघ्या जगात दिसेल. ही परिषद म्हणजे भारतासाठीचा 'लगान' क्षण आहे. जगभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एकतेचा, धैर्याचा आणि एका अशा दृष्टिकोनाचा क्षण आहे, ज्याचा प्रतिध्वनी आपल्या सीमांच्याही पलीकडे ऐकू येत राहील.

**लेखक : आमिर खान, अभिनेता आणि निर्माते**

**(सौजन्य: पीआयबी, मुंबई)**

# शेणोली जि.प.शाळेचे यश

## उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



कराड : शेणोली ता. कराड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुली) व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुले) या दोन्ही शाळांतील विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय मंथन परीक्षा २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन करत उत्कृष्ट निकालाची परंपरा यशस्वीपणे कायम ठेवली आहे.

जि.प. प्रा. शाळा शेणोली (मुली) शाळेतील आराध्या सागर माने (इ. २ री) हिने राज्यात ९वा, जिल्ह्यात ४था क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय बक्षीस पटकावले. दूर्वा वैभव माळी (इ. ३ री) हिला राज्यात १३वा, जिल्हा ८वा, तर केंद्रात २रा क्रमांक मिळाला. स्वरूपा महेश महिंद (इ. ३ री) हिला राज्यस्तर २३वा, जिल्हा १८वा, केंद्रस्तर ४था क्रमांक प्राप्त झाला. अनन्या प्रकाश माने (इ. २ री) राज्यात १३वा, जिल्हा ८वा व केंद्रात २रा क्रमांकाने यशस्वी झाली. राजवीरा संजय कणसे (इ. २ री) हिला राज्यस्तर १८वा, जिल्हास्तर १३वा व केंद्रस्तर ५वा क्रमांक मिळाला. तर श्रेया दिग्विजय जाधव (इ. १ ली) हिला राज्यात १४वा, जिल्हा ९वा व केंद्रात १ला क्रमांक मिळून केंद्रस्तरीय बक्षीसास पात्र ठरली.

या यशस्वी विद्यार्थिनींना केंद्रप्रमुख श्री राजेंद्र कुंभार, मुख्याध्यापिका सौ. विजया गोतपागर, वर्गशिक्षिका सौ. सविता कुंभार व सौ. मनिषा देसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर जि.प. प्रा. शाळा शेणोली (मुले) शाळेतील शिवनंदन शांताराम कणसे (इ. ३ री) याने केंद्रात ६वा क्रमांक पटकावत यश मिळवले. त्याला मुख्याध्यापक श्री.नरेंद्र सावंत, सौ. वर्षा शिंदे, सौ. मनिषा देसाई व यांनी मार्गदर्शन केले.या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेच्या वतीने, केंद्रप्रमुख मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच पालकांच्या उपस्थितीत करण्यात आला. विद्यार्थ्यांचे हे यश म्हणजे शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष आहे.

# बईची हवा मर्यादेहून अधिक प्रदूषित, उन्हाळ्यातही गंभीर स्वरुप; कारण काय?

मुंबई : उन्हाळ्यामध्ये हवा तापल्याने हलकी होते आणि वर जाते. यामुळे हवेतील प्रदूषके साचून राहत नाहीत. मात्र मुंबईमध्ये सर्वांत घातक असलेल्या 'पीएम १०' या प्रदूषकाचे प्रमाण वर्षभर सुरक्षित मर्यादेपेक्षा अधिक असून, उन्हाळ्यातही ते गंभीर स्वरूपाचे असल्याचे समोर आले आहे.

'रेस्पायरर लिव्हिंग सायन्सेस'च्या चार वर्षांच्या अभ्यासावरून ही माहिती समोर आली आहे. हा अभ्यास ॲटलास एक्यू येथे उपलब्ध असलेल्या 'पीएम १०'च्या आकड्यांवर आधारलेला आहे.

मुंबईमध्ये 'पीएम १०'ची प्रदूषण पातळी सातत्याने राष्ट्रीय सुरक्षित मर्यादा ६० मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटरपेक्षा अधिक होती. हिवाळ्यात आणि उन्हाळ्यातही हीच स्थिती असल्याचे दिसून आले. गेल्या चार वर्षांमध्ये २०२१ ते २०२४ या कालावधीत या प्रदूषकाची मुंबईतील पातळी अनुक्रमे १०९.३ मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर, ११९.७ मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर, ११८.६ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर आणि ९० मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर होती. सन २०२४मध्ये 'पीएम १०'च्या प्रमाणामध्ये घट झाल्याचे दिसले तर प्रत्येक वर्षी ही पातळी सुरक्षित मर्यादेहून अधिक होती. या प्रदूषकाचे सरासरी प्रमाण या चारही वर्षांमध्ये एकदाही राष्ट्रीय मानकांहून कमी नव्हते.'पीएम १०'च्या सरासरी पातळीसोबत मुंबईतील काही ठिकाणी हे प्रमाण अधिक तीव्र होते. सन २०२४ मध्ये मालाड पश्चिम येथे हे प्रमाण १५४.५ मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर नोंदले गेले. ते गेल्या वर्षाच्या तुलनेत ५० टक्के जास्त होते. शिवाजीनगर येथे सन २०२१ मध्ये २११ मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर, तर सन २०२४ मध्ये १०२ मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर 'पीएम १०'ची नोंद झाली.

# शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील शेरा कमी करण्यास मंजुरी

शिराळा : चांदोली राष्ट्रीय उद्यानातील खुंदलापूर पैकी धनगरवाडा व जानाईवाडी येथील शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील वन विभागाचा संपादित शेरा कमी करण्यास मंजुरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वन्यजीव मंडळाच्या बैठकीत झाली आहे. हा एक ऐतिहासिक निर्णय शेतकऱ्यांच्या दृष्टीने झाला आहे. अशी माहिती आमदार सत्यजित देशमुख यांनी दिली. यावेळी बोलताना सत्यजित देशमुख म्हणाले :-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक १७ एप्रिल रोजी व वन्यजीव मंडळाची बैठक पार पडली. बैठकीला वन मंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, प्रधान मुख्य वन संरक्षक(वनबल) शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार सत्यजित देशमुख म्हणाले :- अभयारण्यग्रस्त खुंदलापूर धनगरवाडा येथील ६८४ हेक्टर क्षेत्र व जानाईवाडी येथील ७३.०९हेक्टर क्षेत्रावर वन विभागाचा संपादनाचा शेरा होता. गेली ३० वर्षापासून हा शेरा कमी करण्यासाठी प्रयत्न आम्ही करत होतो.परंतु त्याला यश येत नव्हते. वनविभागाचा संपादनाचा शेरा असल्याने येथील शेतकऱ्यांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळत नव्हता. पी. एम.किसान योजना, नमो सन्मान योजना, शेतकऱ्यांना कर्ज,कोणतेही शासकीय अनुदान यापासून शेतकरी व ग्रामस्थ वंचित राहत होते. याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.



तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वन मंत्री गणेश नाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत होतो त्यानुसार वन्यजीव मंडळाच्या बैठकीत जमिनी वरील वन विभागाचा संपादन शेरा कमी करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून यापुढे हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे जाणार आहे.केंद्राची देखील लवकरच मान्यता घेतली जाईल. याबाबत केंद्रीय वनमंत्री भूपेंद्रसिंह यादव यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असल्याचे आमदार सत्यजित देशमुख यांनी सांगितले. या निर्णयामुळे येथील शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे. हा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वन मंत्री गणेश नाईक यांचे आभार व्यक्त केले.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ※ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# प्रकल्पग्रस्तांना ४ कोटी निधी मंजूर : आ.जयंतराव पाटील

इस्लामपूर : माजी मंत्री आ.जयंतराव पाटील व त्यांच्या प्रकल्पग्रस्त कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्न व पाठपुराव्यातून चांदोली अभयारण्य प्रकल्पग्रस्तांना मूलभूत सोई-सुविधा पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाच्या जनवन योजने अंतर्गत ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

चांदोली अभयारण्य प्रकल्पग्रस्तांच्या वाळवा, शिराळा व मिरज तालुक्यातील १६ वसाहतींना प्रत्येकी २५ लाख रुपयांचा हा निधी मिळणार आहे. चांदोली अभयारण्य प्रकल्पग्रस्तांच्या मागणी व लढ्याला अखेर यश आल्याने सर्व वसाहतीमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. ही माहिती चांदोली अभयारण्य प्रकल्पग्रस्त कार्यकर्ते राम सावंत (तुंग) यांनी दिली.डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन योजने अंतर्गत चांदोली अभयारण्य प्रकल्पग्रस्त वसाहतीमध्ये मूलभूत सोई-सुविधा करण्या साठी हा निधी मिळाला आहे. आ.जयंतराव पाटील व त्यांचे प्रकल्पग्रस्त कार्यकर्ते गेल्या २-३ वर्षांपासून हा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करीत होते. कुपवाड (सांगली) येथील वनविभाग कार्यालयाकडे हा निधी मिळावा म्हणून लेखी अर्जाद्वारे मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे सर्व वसाहतीमध्ये जन वन योजना समित्या स्थापन करून त्यांच्या मार्फत वन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. या प्रस्तावामध्ये काही अडचणी व त्रुटी आल्या होत्या,त्या सर्व पूर्ण



करण्यात आल्या. डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी जनवन योजनेचे प्रस्ताव मंजूर होऊन त्यास निधी मिळण्या साठी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांच्या तांत्रिक मंजूरी मिळण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. गेल्या ८-९ महिन्यांपूर्वी सर्व प्रकल्पग्रस्त वसाहतींचे जन वन योजनेचे प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरी व निधी मिळण्यासाठी पाठविण्यात आले होते. हा प्रस्ताव मंजूर होऊन त्यास निधी मिळण्यासाठी प्रकल्पग्रस्त कार्यकर्त्यांनी राज्य स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्याने चांदीली अभयारण्य प्रकल्पग्रस्त कार्यकर्त्यां च्या मागणी व लढ्याला अखेर यश मिळाले आहे. राम सावंत,ज्ञानदेव पवार,शंकर लोखंडे, दीपक वाघमारे,लक्ष्मण सावंत,मारुती रेवले, बिरु येडगे,सुनिल पाटील,चंद्रकांत सावंत, मिथुन पवार यांच्यासह चांदोली अभयारण्य प्रकल्पग्रस्त कार्यकर्त्यांनी आ.जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा निधी मिळण्यासाठी मोठे परिश्रम घेतले आहेत. सर्व कार्यकर्त्यांनी आ.जयंतराव पाटील यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

# लाहोटी कन्या प्रशालेचे उज्वल यश

कराड : शिक्षण मंडळ कराड,संचालित स्व. शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनींनी छत्रपती संभाजीनगरस्थित संस्कृत प्रतिष्ठानमार्फत घेण्यात आलेल्या संस्कृत ऑलंपियाड स्पर्धेत उज्वल यश संपादन केले. सई उमेश गुरव हिने १०० पैकी १०० गुण,अंजली गिरीश पाठक हिने ९९ गुण तर प्रणाली रमेश जाधव हिने ९८ गुण मिळवून अनुक्रमे सुवर्ण रजत व ब्राँझ पदक संपादन केले.देवयानी घनश्याम जेऊरकर, त्रिशा विजय शिंदे,अनुष्का चंद्रकांत वळंजू,ईशा शशीभूषण पाटील, स्मिती हेमंत सावंत, शिवांजली राहुल नलावडे व श्रेया सचिन कुमार पवार या विद्यार्थिनींनी ९०



पेक्षा अधिक गुण मिळवून यश संपादन केले. संस्कृत व्याकरणावर आधारित असलेली ही परीक्षा सद्यस्कमाध्यमाने(ऑनलाईन ) तीन फेरीमध्ये घेण्यात आली होती. संस्कृत अध्यापिका माधुरी कुलकर्णी, प्रांजली कुलकर्णी,प्राची नाखरे यांनी परीक्षेसाठी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले होते. प्रशालेच्या मुख्याध्यापिका हेमलता जंगम,उपमुख्याध्यापिका छाया कुंभार, पर्यवेक्षिका सुनिता अवघडे,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेचा लाभ घ्यावा : आ.सत्यजित देशमुख

शिराळा : देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना जाहीर केली आहे. घरगुती सोलर यंत्र बसवण्यासाठी शासन अनुदान देणार असून वीज ग्राहकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले आहे. शिराळा तहसील कार्यालयामध्ये प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेच्या संदर्भात बैठक पार पडली. यावेळी शिराळा तहसिलदार शामलाताई खोत,गटविकास अधिकारी प्रकाश पोळ,वीज वितरण शिराळा उपअभियंता लक्ष्मण खटावकर वाळवा उपअभियंता सचिन जगताप प्रमुख उपस्थित होते.



यावेळी बोलताना आमदार सत्यजित देशमुख म्हणाले:- देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सूर्य घर मोफत वीज योजना जाहीर केले आहे. या योजनेअंतर्गत दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज उपलब्धता व साध्यता करणे व एक कोटी घरांना रूफ-टॉप सोलर यंत्रणा प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. शाश्वत विकास आणि लोकांच्या कल्याणासाठी पंतप्रधान सूर्यग्रह मोफत वीज योजना सुरू केली आहे. घरगुती कनेक्शन असलेल्या वीज ग्राहकांना ऑनलाईन नोंदणी ५९० रुपये फी भरून करण्याचे आहे. नोंदणी झाल्यानंतर सोलर पॅनेल बसवून विज निर्मिती सुरू केल्यानंतर पंधरा दिवसात बँक खात्यावर केंद्र सरकार अनुदान जमा करणार आहे. नॅशनल पोर्टलवर याची नोंदणी करण्याचे आहे. २५ ते २७ हजार नोंदणीकृत परवानाधारक पॅनेल बसवणारे एजन्सी यासाठी नेमले असून याची निवड ग्राहकांनी करायची आहे. या अगोदर दोन्ही मीटर स्वतः ग्राहकांना घ्यावी लागत होती.परंतु आता महावितरण कंपनीमार्फत दोन्ही मीटर मोफत बसविली जाणार आहेत. ग्रामपंचायत प्रोत्साहन योजना आहे लोकांना यासाठी प्रोत्साहित करायचे आहे. घरगुती सोलर कनेक्शन जोडणी साठी प्रत्येक कनेक्शन एक हजार रुपये अनुदान ग्रामपंचायतीस मिळणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारने एक कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात पाच हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या गावात सर्वात जास्त सोलर ऊर्जा प्रकल्प जोडले जातील त्याचा जिल्ह्यात नंबर काढून एक कोटी रुपयाचे ग्रामपंचायत बक्षीस दिले जाणार आहे.

आमदार देशमुख पुढे म्हणाले, घरगुती सोलर ऊर्जा प्रकल्प बसवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून सात टक्के व्याजदराने कर्ज मिळणार आहे. यासाठी बँकेचा सिव्हिल स्कोर ची अट घातली जाणार नाही. तसेच एक किलो व्हॉट क्षमता असणाऱ्या सोलर पंप साठी तीस हजार अनुदान,दोन किलो व्हॉट क्षमता असणाऱ्या सोलर पंप साठी साठ हजार रुपये अनुदान, तर तीन किलो व्हॉट पेक्षा जास्त क्षमता असणाऱ्या सोलर साठी ७८ हजार रुपये अनुदान केंद्र सरकार देणार आहे. प्रधानमंत्री सुर्य घर मोफत वीज योजनेचा लाभ जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी घ्यावा असे आवाहन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले आहे.

# अश्विनी पाटीलची बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी सहाय्यक अधिकारी पदी निवड

शिराळा : सध्या कोकरुडात वासतव्यास असणाऱ्या व मुळगाव भेडसगांव (ता.शाहूवाडी ) येथील एका सामान्य कुटुंबातील अश्विनी अशोक पाटील हिची स्पर्धा परिक्षेतून बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी सहाय्यक अधिकारी पदी निवड झाली आहे. विज्ञान शाखेतून रसायनशास्त्र विषयात अश्वीनीने एमएससी केली आहे. अश्विनीची आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच आहे. मात्र अश्वीनीने बेताच्याच असणाऱ्या आर्थिक परिस्थीचे कधीही भांडवल केले नाही.

शिक्षण घेत असताना, स्पर्धा परिक्षेचा करीत असताना येणाऱ्या प्रत्येक समस्या, अडीअडचणी यावर अश्वीनीने धैर्याने मात केली.

परिस्थितीवर मात करत विशेषतः घरीच अभ्यास करत पहिल्याच प्रयत्नात अश्वीनीने सदरच्या यशाला गवसणी घातली घातली आहे.स्पर्धा परिक्षेच्या अभ्यासासाठी वडील अशोक पाटील, आई राजश्री पाटील, भाऊ फत्तेसिंग पाटील तसेच मांगरुळचे मामा संजय शेणवी, अमर शेणवी, मामी अनिता शेणवी, रेखा शेणवी यांचे विशेष तिला पाठबळ मिळाले आहे.

अश्विनीस वैद्यकीय सेवेतील डॉ. एस. एन. पाटील, एम.डी. अशोक राजाराम पाटील यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले आहे. तिचे प्राथमिक शिक्षण कोकरुडच्या मातोश्री हिराई देशमुख प्राथमिक विद्यालयात, माध्यमिक मातोश्री माध्यमिक तसेच मांगरुळच्या श्री शिवाजीराव देशमुख विद्यालयात झाले आहे.

उच्च माध्यमिक शिक्षण कोकरुडच्या यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात झाले आहे. महाविद्यालयीन शिक्षण प्रा. एन. डी. पाटील महाविद्यालय (पेरिड-मलकापूर) येथे झाले आहे. वैद्यकीय सेवेतील डॉ. एस. एन. पाटील, एम.डी. अशोक राजाराम पाटील यांचेसह वडील अशोक पाटील, आई राजश्री पाटील, भाऊ फत्तेसिंग पाटील तसेच मांगरुळचे मामा संजय शेणवी, अमर शेणवी, मामी अनिता शेणवी, रेखा शेणवी यांचे विशेष अश्विनीला मार्गदर्शन, पाठबळ मिळाले आहे.



प्रत्येकाची कौटुंबिक परिस्थिती एकसारखी नसते. शिक्षण घेत असताना विशेषतः स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करत असताना विशेषतः कौटुंबिक परिस्थितीचा बाव, कमीपणा बाळगू नये. कौटुंबिक परिवारात येणाऱ्या प्रत्येक संकटांना धैर्याने सामोरे जा, त्यांचा सामना करा. विशेषतः कौटुंबिक परिवारातील आई-वडीलांचे कष्ट आठवा, स्मरा. निश्चित ध्येय ठरवा. भरपूर कष्ट करा. तुमच्यातील क्षमता विकसित करा, यश नक्की मिळतेच.

**- अश्विनी अशोक पाटील,**
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी सहाय्यक अधिकारी.

# भाजपा वाळवा पश्चिम मंडलच्या अध्यक्षपदी डॉ.सचिन पाटील यांची सलग तिसऱ्यांदा निवड

इस्लामपूर - शिराळा विधानसभा मतदारसंघातील वाळवा पश्चिम (पेठ) मंडलाच्या अध्यक्ष पदाची निवडणूक पेठनाका येथे भाजपा जनसंपर्क कार्यालयात पार पाडली. वाळवा पश्चिम मंडलाच्या अध्यक्षपदी सलग तिसऱ्यांदा डॉ. सचिन बाळासाहेब पाटील यांची फेरनिवड झाली. यावेळी भाजपा जिल्हा प्रभारी अध्यक्ष दिपकबाबा शिंदे, आ. सत्यजितभाऊ देशमुख, वनश्री दुध संघाचे चेअरमन व भाजपा नेते सम्राटबाबा महाडीक यांची प्रमुख उपस्थिती होती. निवडणूक अधिकारी म्हणून राजाराम पाटील यांनी काम पाहिले. दरम्यान जिल्हाध्यक्ष दिपकबाबा शिंदे यांनी अध्यक्ष पदाचे नाव जाहीर केले. निवडीनंतर डॉ. सचिन पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



आ. देशमुख म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या बूथ रचना केल्यामुळे निवडणूक सोपी जाते. यापुढे पक्षाचा व सरकारचा अजेंडा सर्वसामान्यांपर्यंत पोचवा. मिळालेल्या संधीचे सोने करा. सरकारने वैयक्तिक योजना आणल्या आहेत, त्या तळागाळापर्यंत पोचवा. एकमेकांना सहकार्य करत यापुढे काम करूया. महाडीक म्हणाले, शिराळा विधानसभा मतदार संघातील ४८ गावातील वाळवा पश्चिम मंडलाच्या अध्यक्ष पदाची निवडणुक पार पडली.

डॉ.पाटील यांची निवड ही त्यांच्या कामामुळे झाली आहे. ते निष्ठेने काम करतील यात शंका नाही. कार्यकर्त्याशी जोडला गेलेला पक्ष व कार्यकर्त्याला ताकद देणारा पक्ष हा भाजप पक्ष आहे. जगातील सर्वात मोठ्या पक्षाचा प्रदेश अध्यक्ष मंडल अध्यक्षाला फोन करतो, ही फार मोठी गोष्ट आहे. यापुढे प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्यात सामावून घेऊया, जनतेची कामे करूया. सरकारच्या माध्यामातून चांगला निधी आपल्याला मिळणार आहे. त्यामुळे लोकांच्यात जाऊन लोकांची कामे करा.डॉ. सचिन पाटील म्हणाले, वाळवा पश्चिम मंडलाच्या अध्यक्षपदी माझी सलग तिसऱ्यांदा सम्राटबाबा महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झाली आहे.

या संधीचा उपयोग करून सम्राटबाबांच्या नेतृत्वात निष्ठेने काम करीन अशी ग्वाही दिली. स्वागत व प्रास्ताविक पै. जयकर कदम यांनी केले तर आभार शुभम पाटील यांनी मानले. यावेळी जि. प. चे माजी सभापती जगन्नाथ माळी, माजी जि. प. सदस्य निजाम मुलाणी, जिल्हा उपाध्यक्ष जयराज पाटील, जिल्ह्याचे सरचिटणीस संजय घोरपडे, बी. एन. पाटील, राहुल पाटील, विजय पाटील, श्रीनिवास भागवत, सरगम मुल्ला, संग्राम गोइंगडे, पै. बबन शिंदे, राहुल महादेव पाटील, दिग्विजय मोहिते, इंद्रजीत पाटील यांच्यासह सर्व मोर्चा व प्रकोष्ठचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**तयारीला लागा**

काही महिन्यात जिल्हापरिषद, पंचायत समिती, नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर होतील. त्यामुळे कार्यकर्त्यांनी आतापासूनच तयारीला लागावे. तळागाळातील लोकांपर्यंत जाऊन त्यांचे प्रश्न समजून सोडविण्याचा प्रयत्न करा. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून प्रत्येक कार्यकर्त्याला योग्य मान मिळेल, असा विश्वास महाडीक यांनी दिला.

# महाबोधी विहार हे बौध्दांच्या ताब्यात मिळावे

## उपोषणास आक्रोश आंदोलनाद्वारे जाहीर पाठिंबा

शिराळा : भारतीय दलित महासंघ मार्फत तहसीलदार शिराळा यांना आक्रोश आंदोलना दरम्यान निवेदन देणेत येते की,बुद्धगया येथे महाबोधी विहार हे बौध्दांच्या ताब्यात मिळावे यासाठी जागतिक बौद्ध धम्मगुरुंच्यावतीने सुरू असलेल्या उपोषणास आक्रोश आंदोलनाद्वारे जाहीर पाठिंबा देत आहे असे निवेदन भारतीय दलित महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीकांत कांबळे व जिल्हाध्यक्ष विनोद आढाव यांनी केली.



या निवेदनात ते म्हणतात, विवेक, शांती, अहिंसा, समानता, सद्सद्विवेकबुद्धी, सदाचार, समानता, विज्ञान व तर्कशास्त्राची शिकवण देणारे बौद्ध धम्माचे संस्थापक तथागत भ. गौतम बुद्ध यांना ज्ञानप्राप्ती झालेल्या बुद्धगया महाबोधी विहारावर सनातनी धर्मांध हिंदुत्ववादी ब्राह्मणांनी कब्जा केला असून अनिष्ट प्रथा सुरू केले आहेत. सदरचे महाबोधी विहार ब्राह्मण मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे व १९४९ चा चौद्ध धम्माच्या आचारसंहितेवर अन्याय करणारा बिहार सरकारचा कायदा रद्द करावा.संविधानिक न्याय मागणीसाठी जागतिक बौद्ध धम्म गुरूंच्या वतीने बुद्धगया या ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनाला आक्रोश आंदोलनाद्वारे भारतीय दलित महासंघाचा जाहीर पाठिंबा देत आहे.

आपल्या धर्माच्या आचारसंहितेचे जतन करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. बिहार सरकारने व पुरातत्व खात्याने जागतिक बौद्ध धम्म गुरुच्या वतीने ब्राह्मण मुक्त महाबोधि विहार या आंदोलनाची संवेदनशीलरित्या दखल घेऊन बौद्ध धम्माच्या आचारसंहितेवर अन्याय करणारा १९४९ वा कायदा तात्काळ रद्द करावा सदरच्या आंदोलनादरम्यान बौद्ध धम्म गुरुंच्या वर बिहार पोलिसांची सुरू असणारी अरेरावी व दादागिरी तात्काळ थांबवावी. धर्मांध हिंदुत्ववादी ब्राह्मण मुक्त महाबोधी विहार आंदोलनाची केंद्रसरकार व बिहार राज्य सरकार यांनी गांभीर्याने दखल घेऊन महाबोधी विहार हे बौद्धांच्या ताब्यात द्यावे अन्यथा भविष्यात कायदा व सुव्यवस्थेच्या निर्माण होणाऱ्या गंभीर प्रश्नाला केंद्र सरकार व बिहार सरकार जबाबदार राहील याची नोंद घ्यावी ही विनंती निवेदनामध्ये करण्यात आली आहे. या निवेदनावर श्रीकांत कांबळे,राष्ट्रीय अध्यक्ष,जिल्हाध्यक्ष विनोद आढाव, जिल्हाध्यक्ष, विकास मोहीते, लक्ष्मण घोलप, दिलीप मोरे,शंकर लोखंडे ज़ सुरेश मोहिते बाळवा तालुका,सचिन कांबळे,सारिका घोलप आदी कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना निमंत्रण

## अधिकाधिक हिंदूंना संघटित करा : योगी आदित्यनाथ

लखनऊ - सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष यानिमित्ताने गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत होणार्या भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे निमंत्रण आज 'गोरक्षपीठ पीठाधीश्वर' तथा उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ महाराज यांना देण्यात आले. या वेळी 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या 'स्वागत समिती'तील सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, जौनपूर, मडियाहू विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री. रविंद्रकुमार पटेल आणि श्री. विश्वनाथ कुलकर्णी यांनी उत्तर प्रदेश राज्यातील लखनऊ येथील मुख्यमंत्री कार्यालयात श्री. योगी आदित्यनाथ महाराज यांची भेट घेतली.



या वेळी प्रथम सनातन संस्थेच्या २५ वर्षांतील कार्याविषयी मुख्यमंत्र्यांना माहिती देण्यात आली. सनातन संस्थेचे कार्य ऐकल्यावर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ महाराज म्हणाले की, सनातन संस्थेचे चांगले कार्य चालू आहे. या कार्याबद्दल तुमचे अभिनंदन ! सध्या हिंदूंमध्ये फूट पाडण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न चालू आहेत. अधिकाधिक हिंदूंना संघटित करणे आवश्यक आहे. अशा कार्यक्रमाच्या माध्यमांतून अधिकाधिक हिंदूंना संघटित करा, असा आशीर्वादही त्यांनी या वेळी दिला.या वेळी 'सनातन संस्था'निर्मित श्रीरामाचे सात्त्विक चित्र असलेली मोठी प्रतिमा, तसेच हिंदु जनजागृती समितीने निर्मिलेली 'हिंदू राष्ट्र आवश्यक क्यो ?', 'हिंदू राष्ट्र स्थापना की दिशा', 'हिंदू राष्ट्र खंडण एवं आक्षेप' आणि 'हलाल जिहाद' ही हिंदी भाषेतील पुस्तके मुख्यमंत्री श्री. योगीजी यांना भेट देण्यात आली.

# माजगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू

माजगाव (रोहित शिखरे) : श्री माऊली ज्ञानेश्वर पारायण मंडळ, ग्रामस्थ माजगांव ता. पाटण यांचे विद्यमाने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताह सुरू झाला आहे. माजगाव आणि परिसरातील भक्त मोठ्या संख्येने विविध कार्यक्रमांना उपस्थिती लावत आहेत. शुक्रवार १८ एप्रिल २०२५ ते शुक्रवार २५ एप्रिल २०२५ पर्यंत चालणाऱ्या सप्ताहामध्ये सर्व भक्त भाविकांनी तन-मन-धन अर्पण करून या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

दिप प्रज्वलन, विना पुजन गुरुवर्य ह.भ.प. गणेश महाराज (साजुर) यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठ चालक सुभाष महाराज (कडेगाव), गायनाचार्य, हरिपाठ, काकडा दत्ता लोहार महाराज,ह.भ.प. निलेश जाधव महाराज (सुर्यवंशीवाडी), श्रीकांत महाराज मुंडे, ह.भ.प. रोहित हिमणे महाराज, आणि ज्योतिर्लिंग भजनी मंडळ, (माजगाव), हार्मोनियम लक्ष्मण चव्हाण महाराज (माजगाव), श्री. वसंत कापून महाराज (माजगाव), मूंदगमनी ह.भ.प.निलेश लोहार महाराज, तालमंथन क्लासेस (सुर्यवंशीवाडी), स्पीकर आणि मंडपाची व्यवस्था श्री. जयवंत मोरे, ऋषिकेश मोरे ही जबाबदारी सांभाळत आहे.

गुरुवार २४ एप्रिल २०२५ रोजी सायं. ४.०० वा. ज्ञानेश्वरी माऊलींची भव्य दिंडी सोहळा होणार असून २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ०९.०० वा. ह.भ.प. आनंदराव देसाई महाराज चाफळ (कार्याध्यक्ष, सातारा जिल्हा वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र) काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद होणार आहे. भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे. भजन, कीर्तन, काकड आरती यासह सर्व धार्मिक कार्यक्रम श्री. ज्योतिर्लिंग मंदिर, माजगाव (ता. पाटण) येथे सुरू आहेत.

# २१ ते २७ एप्रिलला काँग्रेसचे सत्य, भाजपचे खोटे मोहीम

## नॅशनल हेराल्ड केस–काँग्रेस ५७ शहरांत ५७ पत्रकार परिषदा घेणार



कराड : नॅशनल हेराल्ड प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) पहिल्या आरोपपत्रात सोनिया–राहुल यांची नावे समाविष्ट केल्याच्या निषेधार्थ काँग्रेस देशभरात पत्रकार परिषदा घेणार आहे. २१ ते २७ एप्रिल दरम्यान ५७ शहरांमध्ये ५७ पत्रकार परिषदा होतील. या मोहिमेला 'काँग्रेसचे सत्य, भाजपचे खोटे' असे नाव देण्यात आले आहे. या काळात भाजपचा खोटेपणा समोर आणला जाईल, असे पक्षाने म्हटले आहे.

अखिल भारतीय काँग्रेस पक्षाकडून ५७ नेत्यांची यादीच प्रसिद्ध करण्यात आली असून त्यामध्ये माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम, राजस्थान चे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, महाराष्ट्र चे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर, मणिकम टागोर, गौरव गोगोई, सुप्रिया श्रीनेत, पवन खेरा, छत्तीसगड चे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, कन्हैया कुमार, रणदीप सिंग सुरजेवाला, राजीव शुक्ला, अलका लांबा अशा अनेक बड्या नेत्यांच्या नावांचा समावेश करण्यात आला आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची बेळगांव येथे २३ एप्रिल रोजी सकाळी जिल्हा काँग्रेस कमिटी, बेळगाव येथे पत्रकार परिषद होणार आहे. १९ एप्रिल रोजी दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेस सरचिटणीस, राज्य प्रभारी आणि आघाडीच्या संघटनांच्या प्रमुखांच्या बैठकीत देशभरात पत्रकार परिषदा घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**पृथ्वीराज चव्हाण यांची बेळगावला पत्रकार परिषद**

# कोयना सहकारी बँकेस १८४ लाखाचा नफा

कराड : नुकत्याच संपलेल्या २०२४–२५ या आर्थिक वर्षात बँकेची सांपतिक स्थिती भक्कम झाली असून बँकेचा नफा १८४ लाख व तरतुदी व कर वजा जाता बँकेस रु. ९०.२१ लाखाचा निव्वळ नफा झाला आहे तर भागभांडवल ७.४३ कोटी, निधी१६.४४ कोटी, ठेवी रु.१८२.६८ कोटी, कर्ज १२८.३६ कोटी, सी आर ए आर १६.२० टक्के आहे. बँकेचा निव्वळ एन पी ए २.१९ टक्के तर बँकेचा एकूण व्यसाय ३११ कोटी झाला असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष रोहित पाटील यांनी दिली.



सन १९९६ साली कराड येथे सुरु झालेल्या कोयना सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र सातारा, सांगली व पुणे जिल्हा असून बँकेच्या एकूण १२ शाखा कार्यरत आहे. बँकेचे सुसज्ज स्वमालकीची मुख्य कार्यालय इमारत असून आहे. बँकेचे मार्गदर्शक व माजी सहकार मंत्री स्व. विलासकाका पाटील (उंडाळकर) तसेच संस्थापक अॅड उदयसिंह पाटील यांचे नेतृत्वाखाली व बँकेचे संचालक मंडळ यांनी निस्वार्थपणे, विश्वस्ताच्या भूमिकेतून काम करून आर बी आय च्या सर्व निकषाची पूर्तता केली आहे.बँक स्थापनेपासून नफ्यात आहे. बँकेस स्थापनेपासून सातत्याने ऑडीट वर्ग 'अ' मिळाला आहे. बँकेने ग्राहक सेवा व आधुनिक बँकिंग सुविधा देणेच्या हेतूने आय IMPS (मोबाईल बँकिंग) व UPI बँकिंगचा अवलंब केला आहे. तसेच ATM (डेबीटकार्ड), डिमांड ड्राफ्ट, RTGS/NEFT/-TM/CTS क्लिअरिंग / SMS/तसेच मिस्ड कॉल इत्यादी सुविधा कार्यान्वित केल्या आहेत. बँक नेहमीच तत्पर सेवा देण्यास कटिबद्ध असून बँकेच्या ठेवी व कर्ज योजनांचा सभासद, खातेदारांनी लाभ घ्यावा असे अवाहन बँकेचे अध्यक्ष रोहित पाटील यांनी केले.

# आंब्रळ येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



महाबळेश्वर(विकास जंगम): मौजे आंब्रळ ,ता. महाबळेश्वर येथे मागील गेले नऊ दिवसापासून सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली.या निमित्त रोज सकाळी काकड आरती , ज्ञानेश्वरी वाचन , हरिपाठ सायंकाळी कीर्तन रोज महाप्रसाद रात्री भजन असे कार्यक्रम करण्यात आले होते.

या सप्ताहात ग्रामस्थ मंडळ आंब्रळ , भजनी मंडळ आंब्रळ तसेच श्री विठ्ठल वारकरी शिक्षण संस्था आळंदी यांचे सहकार्य लाभलेले नियोजक ह.भ.प श्री रवींद्र महाराज आंब्राळे , विणेकरी – गुलाब आंब्राळे , चोपदार – दत्तात्रय आंब्राळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

किर्तनसेवा– ह.भ.प. संतोष महाराज बर्गे ( गुरेघर ) , ह.भ.प. मुक्ताताई डेरे (म्हसवड ) , ह.भ.प. विकास महाराज भिलारे ( पुस्तकांचं गाव भिलार ), ह.भ.प. चैतन्य महाराज पाडळे ( श्री राम वारकरी शिक्षण संस्था रामवाडी ), ह.भ.प. रोहिदास महाराज मालुसरे (व्याजवाडी ) ह.भ.प. श्री रवींद्र महाराज आंब्राळे (आंब्रळ श्री विठ्ठल वारकरी शिक्षण संस्था आळंदी ), ह.भ.प. सुनील महाराज शिंदे ( संस्थापक / अध्यक्ष : पसायदान वा.शि. संस्था सासवड ) ह.भ.प. ज्योतीताई मतकर (अध्यक्ष :वा. शि. संस्था आळंदी ) व ह.भ.प. मधुसूदन महाराज महिपाल ( राजाळे) यांचे काल्याचे कीर्तन झाले . तसेच सायंकाळी डोळ्याला दीपवून टाकणारा दीपोत्सव साजरा झाला दुसऱ्या दिवशी संपूर्ण गावातून पालखी ग्रामदिंडीला मोठा प्रतिसाद लाभला. या मध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय होता हातात टाळ, मृदूंग मुखी हरिनामाचा गजर करत दिंडी उत्साह मध्ये पार पडली.

यामध्ये महिलांच्या सहभागाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.या ग्रामदिंडीमध्ये डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन सहभागी झालेल्या महिला व माहेरवासिनी टाळ व मृदूंगाच्या गजरात तल्लीन झाल्या होत्या कुंभळजाई मंदिरात महिलांच्या फुगड्या आणि तल्लीन झालेले श्री विठ्ठल वारकरी शिक्षण संस्था आळंदी येथील विध्यार्थी यांनी वातावरण तेजमय झाले होते. शेवटी काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद होऊन दिंडी ची सांगता झाली .

# शेतकऱ्यांनी सोलारसाठी जास्तीचे पैसे देऊ नयेत;महावितरणचे आवाहन

सातारा – सोलार बसविण्यासाठी शेतकऱ्यांकडून खड्डे खोदून घेणे, वाहतुकीसाठी पैसे मागणे तसेच त्यांना सिमेंट, वाळू आणण्यास सांगणे आदी प्रकारच्या तक्रारी काही भागातून महावितरणकडे येत आहेत. त्या सर्व तक्रारींची महावितरण दखल घेत असुण्न, शेतकऱ्यांनीही कोटेशन व्यतिरिक्त रक्कम कोणाला देऊ नये असे आवाहन महावितरणने केले आहे.शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरणतर्फे 'मागेल त्याला सौर कृषीपंप योजना' सुरु आहे. तर यापूर्वी केंद्रसरकारच्या 'कुसुम–बी' योजनेतून सौर पंप आस्थापीत केले आहेत. अनुसुचित जाती व जमातीमधील शेतकऱ्यांना ९५ टक्के तर इतर वर्गवारीतील शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानातून सौर पंप मिळतात. त्यासाठी तीन अश्वशक्तीला (एचपी) अनुसुचित जाती व जमातीकरिता ११४८६ रुपये, इतरांकरिता २२९७१ रुपये, पाच अश्वशक्तीसाठी अनुक्रमे १६०३८ रुपये व ३२०७५ रुपये आणि ७.५ अश्वशक्तीला २२४६५ रुपये व ४४९२९ रुपये भरावे लागतात. भरलेल्या रकमेतून सोलारपंप आस्थापित करण्यापासून त्याचे कार्यान्वयन, देखभाल दुरुस्ती आदींचा समावेश केलेला आहे. त्यामुळे कोटेशनच्या रकमे व्यतिरिक्त कोणतेही आगाऊ शुल्क घेतले जात नाही.

शेतकऱ्यांनीही अशी आगाऊ रक्कम कोणाला देऊ नये अथवा साहित्य आणून देऊ नये. त्यासाठी कोणी पैशाची मागणी करत असेल तर नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. तिथे तक्रारीची दखल न घेतल्यास सातारा मंडल कार्यालयातील नोडल अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता वहिदा बागवान यांच्या ९०२९१६८५१८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करावी. आलेल्या सर्व तक्रारींची महावितरणकडून चौकशी केली जाईल. तसेच सोलार कंपनीचा दोष आढळून आल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महावितरणने कळविले आहे.

# साक्षी बनसोडे हिचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान



औंध : औंध शिक्षण मंडळाच्या राजा भगवंतराव ज्यु. कॉलेज व राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. साक्षी बनसोडे हिने आंतरराष्ट्रीय पातळीवरील ज्युदो डीफ खेळ प्रकारातील सुवर्णपदक मिळवल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने तिचा शिवछत्रपती पुरस्कार देऊन नुकताच पुणे येथे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन राज्यपाल यांच्या सन्मान करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, क्रीडामंत्री ना. दत्तात्रय भरणे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.चंद्रकांत पाटील व मान्यवर उपस्थित होते. कु. साक्षी बनसोडे हिला मिळालेल्या पुरस्काराबद्दल औंध व सिध्देश्वर कुरोली तसेच खटाव तालुक्यातून तिचे अभिनंदन केले जात आहे.

# भाजपचा कार्यकर्ता म्हणून काम करणे अभिमानास्पद : ना.शिवेंद्रसिंहराजे

## सातारा-जावली मंडल पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर



सातारा – भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे. भाजपमध्ये पदाधिकारी असो वा कार्यकर्ता प्रत्येकाला सन्मानाची वागणूक दिली जाते. पक्षाच्या माध्यमातून संघटनात्मक बांधणी बरोबरच जनतेचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य दिले जाते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पदाला साजेसे काम करून पक्ष अधिक बळकट करावा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री देवेंद्रजी पडणवीस यांच्या विचाराने कार्य करा. भाजपचा कर्यकर्ता म्हणून काम करणे म्हणजे अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले. सातारा– जावली विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या विविध मंडल अध्यक्षांच्या निवडी उत्साहात पार पडल्या. याप्रसंगी ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, विधानसभा संयोजक अविनाश कदम, जेष्ठ नेते दत्ताजी थोरात, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक ज्ञानदेव रांजणे, विठ्ठल बलशेटवार, सौ. सुवर्णा पाटील, सौ. रंजना रावत, विकास गोसावी, विकल्प शहा यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या निवडीमध्ये सातारा शहर अध्यक्ष (मध्य) अविनाश खर्शीकर, सातारा शहर अध्यक्ष (बाह्य) सौ. वैशाली टंगसाळे, सातारा तालुका (उत्तर) अध्यक्ष महेश गाडे, सातारा तालुका (दक्षिण) अध्यक्ष विजय गुजर, जावली तालुका (पूर्व) अध्यक्ष संदीप परामणे आणि जावली तालुका (पश्चिम) अध्यक्ष म्हणून मारुती चिकणे यांची निवड करण्यात आली. या सर्वांना ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी पक्ष बळकटीकरणासाठी कार्यरत राहावे तसेच कायम जनतेत राहून पक्षाची ध्येय धोरणे आणि काम जनतेपर्यंत पोहचवण्यास प्राधान्य द्यावे, असे ना. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले. ज्यांना संधी मिळाली नाही त्यांनी नाराज न होता पक्षासाठी काम करावे, योग्य वेळी योग्य व्यक्तीची दखल पक्ष घेत असतो. प्रत्येकाला आगामी काळात वेगवेगळ्या पदावर काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे पदाधिकारी असो वा कार्यकर्ता प्रत्येकानी पक्षाशी निष्ठा ठेवून संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यरत राहावे, असे आवाहन ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी यावेळी केले.

# किसन भाऊ हासे यांची प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र, मुंबई कार्याध्यक्षपदी निवड



मुंबई – महाराष्ट्रातील ग्रामीण पत्रकारीता व पत्रकारांच्या प्रश्नांसाठी ३० वर्षाहून अधिक काळ कार्यरत असणारे किसन भाऊ हासे यांची मुंबई येथील प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र संस्थेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याचे संस्थेचे संस्थापक अॅड. इलियास खान यांनी कळविले आहे. या नियुक्तीने श्री. किसन हासे करत असलेल्या कार्याचा सन्मान झाला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

छोट्या वृत्तपत्रांच्या व संपादक पत्रकारांच्या शासन स्थरावरील प्रश्न सोडविण्यासाठी किसन भाऊ हासे व त्यांचे सहकारी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. राज्यातील संपादक पत्रकारांच्या संघटनांसाठी त्यांनी अनेक अधिवेशने, राज्य परिषदा आयोजीत करून संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र, मुंबई या संस्थेद्वारे संघटनात्मक बांधणी केली आहे. २००७ साली त्यांनी महाराष्ट्र संपादक डायरीची निर्मिती करीत असतांना संपूर्ण राज्याचा दौरा केला आहे. संपादक पत्रकारांच्या अडचणीच्या प्रसंगी विविध ठिकाणी भेटी देऊन ते सहकार्य करीत आहेत. प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ही लढाऊ पत्रकारांची संस्था असून या संस्थेद्वारे वृत्तपत्रांवरील व पत्रकारांवरील अन्याय दुर करण्यासाठी प्रसंगी न्यायालयात धाव घेऊन अडचणींची सोडवणूक केली जाते. महाराष्ट्र सरकारच्या विविध शासकीय समित्यांवर पत्रकारांच्या नेमणूका व्हाव्यात म्हणूनही संस्था सातत्याने कायदेशीर लढा देत असल्याची माहिती अॅड. इलियास खान यांनी दिली आहे. पत्रकारांच्या लढ्यात किसन भाऊ हासे यांनी सतत खंबीर साथ दिल्याने त्यांची कार्याध्यक्षपदी निवड केल्याचे अॅड. खान यांनी नमूद केले आहे. या निवडीनिमित्त किसन भाऊ हासे यांचे राज्यातील संपादक व पत्रकारांकडून विशेष अभिनंदन होत असून त्यांच्या कार्यात सक्रिय सहभागी राहाण्याची भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत. प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र या संस्थेचे लवकरच मुंबई येथे राज्य अधिवेशन घेतले जाईल. शासन स्थरावरील वृत्तपत्रे व पत्रकारांच्या संदर्भातील उर्वरीत प्रश्नांसदर्भात योग्य निर्णय करून ग्रामीण पत्रकारीतेस न्याय दिला जाईल.

याकामी किसन भाऊ हासे यांचे सहकार्य लाभेल आणि प्रश्नांची सोडवूणकही केली जाईल. असा विश्वास संस्थेचे संस्थापक अॅड.इलियास खान यांनी व्यक्त केला आहे.

# खाजगी वाहनांवर 'प्रेस', 'पोलीस', 'खासदार', 'आमदार'च्या नावाचा गैरवापर

## नागरिकांची दिशाभूल, प्रशासनाची चिंता









मुंबई(संजू पाटील) : राज्यातील विविध भागांत खाजगी वाहनांवर 'प्रेस', 'पोलीस', 'खासदार', 'आमदार' अशा प्रकारचे स्टिकर्स, लोगो किंवा फलक लावून सामान्य नागरिकांची दिशाभूल करण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. ही बाब केवळ नैतिकतेच्या चौकटीत अडकलेली नसून यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.या वाहनधारकांकडून बोगस ओळख निर्माण करून टोल न भरणे, नो–पार्किंगमध्ये वाहन उभे करणे, पोलीस तपासणी टाळणे किंवा वाहतुकीचे नियम मोडणे यासारख्या कृती सर्रासपणे केल्या जात आहेत. अनेकदा हे वाहनधारक सामान्य नागरिकांवर दबाव आणून आपलीच सत्ता गाजवत असल्याचे चित्र दिसून येते.

**नावामागे भीती–'फेक पॉवर'चा दुरुपयोग**

'पोलीस' किंवा 'खासदार' असे नाव वाहनावर झळकत असल्यामुळे नागरिकांच्या मनात आपोआप एक अनामिक भीती निर्माण होते. ट्रॅफिक पोलिसांनाही अशा वाहनांची तपासणी करताना दोनदा विचार करावा लागतो, कारण त्यामागे खऱ्या अधिकाऱ्यांचा संबंध असेल, अशी शक्यता गृहित धरली जाते. याचाच गैरफायदा घेत काही फसवे लोक, आपली विशेष ओळख असल्याचे भासवून नियमांची पायमल्ली करतात.

**तपासणीची गरज–प्रशासनाची जबाबदारी**

सध्याच्या घडीला ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज आहे. अशा गाड्यांची तपासणी करून संबंधित वाहन खरोखरच अधिकृत पत्रकार, पोलीस अधिकारी किंवा लोकप्रतिनिधीची आहे का, याची कागदोपत्री पडताळणी करणे आवश्यक ठरते. जर तशी अधिकृतता नसेल, तर अशा वाहनधारकांवर फसवणूक, दिशाभूल आणि कायद्याचा अपमान केल्याबद्दल कठोर कारवाई केली जावी.

**प्रशासनाकडून विशेष मोहिमेची अपेक्षा**

वाहतूक विभाग, पोलीस आणि आरटीओ यांनी संयुक्तरीत्या कारवाई करत अशा फसव्या स्टिकर्स व नावांचे वापर रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी आता नागरिकांतून जोर धरत आहे. यासाठी नियमबाह्य वाहनांवर दंडात्मक कारवाईसह त्यांच्या वाहन नोंदणीवर प्रतिबंधात्मक नोंदीही केल्या जाव्यात, असेही सुचवले जात आहे.तरी

खोट्या प्रतिष्ठेच्या आड नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या या प्रवृत्तींवर अंकुश आणणे अत्यावश्यक झाले आहे. प्रशासनाने वेळीच पावले उचलली नाहीत, तर कायदा आणि शिस्त या संकल्पनाच भविष्यात धोक्यात येतील.